## प्रेस नोट

पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला.

दिनांक : ११/०५/२०१८

# अकोला जिल्हा पोलीस दलाचे नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण



अकोला जिल्हा पोलीस दलाच्या नव्या संकेतस्थळाचा लोकार्पण आज दिनांक ११/०५/२०१८ ला पोलीस अधीक्षक श्री. एम.राकेश कलासागर यांचे शुभ हस्ते करण्यात आले. अकोला जिल्हा पोलीस दलाचे www.akolapolice.gov.in हे जुने संकेतस्थळ सन २०१३ मध्ये चालू करण्यात आले होते. सदरचे संकेतस्थळ हे संगणकावरच ओपन करण्यापर्यंत मर्यादीत होते, परंतू नुतनीकरण केलेले www.akolapolice.gov.in हे संकेतस्थळ ॲडव्हान्स इन्क्रीप्शनद्वारे तयार केल्याने ते सहज मोबाईल, टॅब, आयपॅड या सारख्या आधुनिक उपकरणांमध्येही सहजपणे ओपन केले जाऊ शकते. तसेच त्यामध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आलेला आहे. नुतनीकरण केलेले संकेतस्थळ हे नागरीकांना सहज हाताळण्यायोगे (User Friendly), लोकाभिमूख बनविण्यात आले आहे.

यापुर्वीच्या संकेतस्थळ फक्त इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात आले होते, ते डेस्कटॉप/लॅपटॉपवर संकेतस्थळ ओपन होत असे, त्यावर माहितीचा अधिकार, पोलीस भरतीविषयक माहिती, पोलीस विभागाचे विविध उपक्रम जनतेसाठी उपलब्ध होते. तर नुतनीकरण केलेले नवे संकेतस्थळ इंग्रजी तसेच मराठी भाषेमध्ये तयार करण्यात आले आहे, ते डेस्कटॉप/लॅपटॉप, आयपॅड, टॅब, मोबाईल वर उपलब्ध होऊ शकणार आहे, यात नागरीकांना गोपनिय माहिती देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, तसेच यात सिटीजन अलर्ट वॉलवर पोलीसांनी टाकलेली माहिती नागरीक बघु शकतात. नव्या वेबसाईटवर जिल्हा पोलीस दलाचे विविध कार्यालय व पोलीस स्टेशन यांचे अधिकारी यांचे संपर्क क्रमांक तसेच नागरीकांना नजिकच्या पोलीस स्टेशनची माहिती तात्काळ उपलब्ध होऊ शकणार आहे. आपल्याकडील भाडेकरुंची माहिती पोलीसांना देण्यासाठी नागरीकांना पोलीस ठाण्यामध्ये जावे लागत असे, परंतू घरमालक आता आपल्या कडील भाडेकरुंची माहिती सदर वेबसाईटवर अपलोड करु शकणार आहेत. ग्रामीण भागातील कार्यरत सर्व पोलीस

पाटील यांची यादी व संपर्क नंबर नव्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे. विशेषत: अंध व्यक्तींना Screen Reader Software चा वापर करून सदरचे संकेतस्थळ वापरण्यास सोपे आहे. सदरचे संकेतस्थळ वापरण्यास तसेच पोलीस कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोलीस लॉन, बॅण्ड पथक व पोलीस जिम यांची नागरीकांना सेवादरासह माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्याने व सर्व नागरीक मोबाईल व इंटरनेटचा मोठया प्रमाणात वापर करीत असल्याने त्यांना त्याद्वारे अकोला पोलीस दलाचे वेबसाईटवर आवश्यक अशी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता सदर नुतनीकरण केलेली वेबसाईट निश्चितच उपयोगाची ठरणार असल्याने नागरीकांनी पोलीस कामकाजासाठी सदर संकेतस्थळाचा मोठया प्रमाणात वापर करण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक श्री.एम.राकेश कलासागर यांनी केले आहे.

(विलास पाटील)

पोलीस निरीक्षक,

शहर वाहतूक नियंत्रण शाखा, अकोला

प्रति,

संपादक,

.......................................................

.......................................................

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.